तरुण भारत गुरुवार, २७ ऑगस्ट २०१५

# 'रंगबहार'ने जपली आबालाल यांच्या दातृत्वाची परंपरा

## विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांचे प्रतिपादन : कलातपस्वी आबालाल रेहमान कलादालनाचे उद्‌घाटन

प्रतिनिधी
कोल्हापूर

आबालाल रेहमान चित्र काढल्यावर, मागेल त्याला देऊन टाकत असत. त्यांनी कलेच्या बाबतीत कधी आर्थिक गणिते मांडली नाहीत. त्यांची हीच परंपरा रंगबहार संस्थेने जपली आहे. रंगबहार संस्थेने आबालाल रेहमान कलादालनाची निर्मिती करून एका ऐतिहासिक ठेव्याचे जतन केले आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.देवानंद शिंदे यांनी केली. शिवाजी विद्यापीठातील कलातपस्वी आबालाल रेहमान कलादालनाच्या उद्‌घाटन प्रसंगी ते बोलत होते.

रंगबहार संस्था गेली ३७ वर्षे कोल्हपुरातील सांस्कृतिक क्षेत्रात कार्यरत आहे. चित्रकला प्रदर्शनातून त्यांनी अनेक नवोदित कलाकारांना व्यासपीठ मिळवून दिले आहे. स्पर्धेच्यावेळी ज्या मान्यवर चित्रकारांनी डेमो चित्रे काढली होती. या चित्रांचा समावेश असणारे कलादालन विद्यापीठामध्ये सुरु करण्यात आले आहे. जगविख्यात चित्रकार आबालाल रेहमान यांचे नाव या कलादालनाला देण्यात आले आहे. कलातपस्वी आबालाल रेहमान कलादालनाचे उद्‌घाटन कुलगुरु देवानंद शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी डॉ. शिंदे म्हणाले, आबालाल रेहमान हे कलासाधक होते. रेहमान यांची चित्रे



कोल्हापूर : कलातपस्वी आबालाल रेहमान कलादालनाचे उद्‌घाटन करताना कुलगुरु देवानंद शिंदे. सोबत शामकांत जाधव, अजेय दळवी, नमिता खोत आदी.

अभ्यासकांना विचार करायला लावायची आणि सामान्य माणसाला चित्रकलेच्या विविध अंगांचा परिचय करून द्यायची. त्यांच्या चित्रातून तत्कालीन सामाजिक, सांस्कृतिक परिस्थितीची कल्पना येते. विद्यापीठातील या कलादालनासाठी रंगबहारने त्यांच्याजवळ असलेली प्रसिद्ध चित्रकारांची चित्रे विनामूल्य दिली. तसेच कलादालनाची रचनाही त्यांनी करून दिली.

ज्येष्ठ इतिहास अभ्यास प्रा. डॉ. जयसिंगराव पवार म्हणाले, 'इतिहास हा केवळ राजकीय नसतो. सांस्कृतिक आणि कला क्षेत्राच्या इतिहासावरून समाजाच्या वैभवसंपन्नतेची कल्पना येते. कोल्हापूर संस्थानाला कलेचा वैभवशाली इतिहास आहे. विद्यापीठाने ज्या प्रमाणे कलातपस्वी अबालाल रेहमान यांचे दालन केले आहे. त्याचप्रमाणे भाई माधव बागल आणि डॉ आप्पासाहेब पवार यांचे दालन उभे करावे. रंगबहार संस्थेचे संस्थापक अध्यक्ष ज्येष्ठ चित्रकार शामकांत जाधव यांनी मनोगतातून आबालाल रेहमान यांच्या चरित्राचा आढावा घेतला. याप्रसंगी बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालयाच्या विस्तारीत इमारतीतील अभ्यासिकेचेही उद्‌घाटन करण्यात आले. यावेळी प्रसिद्ध चित्रकार विजय टिपुगडे यांनी समारंभाचे सूत्रसंचालन केले. विद्यापीठाच्या ग्रंथपाल डॉ. नमिता खोत यांनी आभार मानले. या समारंभाला प्राचार्य अजेय दळवी, प्रसिद्ध निवेदक आणि सिनेअभ्यासक रियाज शेख, गायन समाज देवल क्लबचे अध्यक्ष व्ही. बी.पाटील, कार्याध्यक्ष श्रीकांत डिग्रजकर, परीक्षा नियंत्रक महेश काकडे, बीसीयुडीचे संचालक डॉ. डी. आर. मोरे, टाऊन हॉल वस्तूसंग्रहालयाचे क्युरेटर अमृत पाटील आदी उपस्थित होते.

**नवीन अभ्यासिका केवळ नियमित विद्यार्थ्यांसाठी...**

बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालयाच्या नूतन वास्तूमध्ये अभ्यासिका सुरु करण्यात आली आहे. या अभ्यासिकेचे उद्‌घाटन कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. ही अभ्यासिका केवळ नियमित प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठीच असणार आहे.